# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २४/७/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.११) इतिवृत्त

**गुरूवार, दिनांक २४ जुलै २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी ४-०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला श्री.उध्दव घुगे, उप आयुक्त(म.), श्री.एम.ए.पठाण, नगर सचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
४. श्री. वसंत नरवडे पाटील
५. श्री. जावेद हसन खान
६. श्री. संजय जोशी
७. श्रीमती जयश्री किवळेकर
८. श्री. रविकांत गवळी
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१०. श्री. कचरू सोनवणे
११. श्री. नारायण कुचे

**विषय क्र. ७० :**

( दि. १/७/२००८ च्या स्थायी समिती सभेत स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव- विषय क्र. ५६ )

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट बांधणे करीता शासकीय अनुदान प्राप्त होणार असून, त्या अंतर्गत कांचनवाडी येथे ७५ द.ल.ली. क्षमतेचा एक किंवा १५ द.ल.ली. क्षमतेचे पाच किंवा २५ द.ल.ली. क्षमतेचे तीन सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट टप्प्या-टप्प्याने बांधण्याचे प्रस्तावीत आहे.

उक्त नमूद केल्याप्रमाणे सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट बांधणे करीता प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण करणे, डिझाईन व नकाशेसह प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करणे, केलेल्या डिझाईन प्रमाणे कामावर देखरेख करणे इत्यादी बाबींसाठी संकल्पनार्थींची (PMC ची) नेमणूक करणे आवश्यक आहे. या कामासाठी मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार संकल्पनार्थींची (PMC) ची नेमणूक करणेसाठी राज्यस्तरीय व प्रादेशिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देवुन अनुभवी कन्सल्टंटकडून दर ऑफर मागविण्यात आले असता एकुण ३ कन्सल्टंट एजन्सींनी खालील प्रमाणे दर ऑफर दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय | ४% + १२.५०% Service Tax |
| २. | एस.बी.एस. असोसिएट्स | ३% Total cost of project |
| ३. | फोर्ट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीस | ४.५% Total cost of project |

वरील प्रमाणे फोर्ट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीस हे अनुभवी आणि सक्षम असल्यामुळे मा.आयुक्त यांचेकडे त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले आणि दर कमी करण्यास सुचविले असता सदर एजन्सीचे प्रतिनिधी श्री.केतन मदनानी यांनी ३% दर अधिक सर्व्हीस टॅक्स या दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. या दराने शहरात इतर ठिकाणीही गरजेनुसार सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट बांधण्यासाठी प्रस्तावीत केल्यानुसार सर्वेक्षण करणे, डिझाईन व नकाशांसह प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करणे, केलेल्या डिझाईन प्रमाणे कामावर देखरेख करणेची कामे संबंधीत एजन्सीकडून करून घेण्याचे प्रस्तावीत आहे.

वाटाघाटी अन्वये निश्चित झालेले दर म्हणजेच प्रकल्पाच्या एकुण किंमतीच्या ३% + सर्व्हीस टॅक्स हे दर मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्यास शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : विषय क्रमांक ७० इतिवृत्त यायला हवे.

मा.सभापती : विषय क्रमांक ५६ हा १.७.२००८ रोजी स्थगित ठेवला होता तो घेतलेलाआहे.

श्री.रविकांत गवळी : दि.१.७.२००८ रोजी विषय क्रमांक ५६ वर आला होता. त्यावेळी तो स्थगित ठेवण्यात आला होता. त्याची चौकशी झाली आहे काय? त्याचा खुलासा आलेला आहे काय?

मा.सभापती : मुख्यलेखापरिक्षक यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखापरिक्षक : झाल्टा चौकशी प्रकरण १.७.२००८ रोजी ठरले होते. परंतु त्याच बरोबर स्पेक ची चौकशी देण्यात आली होती. स्पेकची संचिका अगोदर आल्यामुळे ११ तारखेपर्यंत चौकशी केली होती. झाल्टा प्रकरणाची चौकशी त्यानंतर करण्यात येईल. दि.११.०७.२००८ रोजी मा.सभापती यांना कळविण्यात आले.

मा. सभापती : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट बांधणे करीता प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदान अंतर्गत कांचनवाडी येथे ७५ द.ल.ली. क्षमतेचा एक किंवा १५ द.ल.ली. क्षमतेचे पाच किंवा २५ द.ल.ली. क्षमतेचे तीन सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट टप्प्या-टप्प्याने बांधणे करीता प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण करणे, डिझाईन व नकाशेसह प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करणे, केलेल्या डिझाईन प्रमाणे कामावर देखरेख करणे इत्यादी बाबींसाठी संकल्पनार्थीची (PMC ची) नेमणूक करणे यासाठी मागविलेल्या निविदानुसार प्राप्त दर ऑफर प्रमाणे अनुभवी व सक्षम एजन्सी फोर्ट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीस यांचेशी झालेल्या वाटाघाटी अन्वये निश्चित झालेले दर म्हणजेच प्रकल्पाच्या एकुण किंमतीच्या ३% + सर्व्हीस टॅक्स या दरावर संकल्पनार्थी (PMC) म्हणून **फोर्ट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीस** यांची नेमणुक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, जनार्थ स्वयंसेवी संस्थेचे पहिले अपंग मित्र कक्ष डिसेंबर २००४ पासून सिल्कमील रूग्णालय व आरोग्य केंद्र येथे कार्यरत असून सध्या अपंग मित्र कक्ष महानगरपालिकेच्या खालील रूग्णालये/आरोग्य केंद्रे येथे कार्यरत आहे.

| अ.क्र. | दवाखाना | सेंटरचा दिवस | वस्तीत मिटींग/ फिल्डवर्कचा दिवस |
|---|---|---|---|
| १. | सिल्कमील कॉलनी रूग्णालय व आरोग्य केंद्र | गुरूवार | बुधवार |
| २. | नेहरूनगर आरोग्य केंद्र | सोमवार | मंगळवार |
| ३. | मुकुंदवाडी आरोग्य केंद्र | शुक्रवार | शनिवार |

सदरील केंद्रात अपंग व्यक्तींना नोंदणी करणे, थेरपी देणे, मोफत शस्त्रक्रिया करून देणे, शैक्षणिक मार्गदर्शन, समुपदेशन इ. कामे कम्युनिटी बेस्ड वर्कर्स व पर्यवेक्षाकांमार्फत केले जाते. अपंग मित्र कक्षाचे काम समाधानकारक असून जनार्थ संस्था अपंग मित्र कक्ष चालवत असल्याने सन २००६-०७ व २००७-०८ या वर्षाच्या कार्योत्तर मंजुरीसाठी व सन २००८-०९ या पुढील वर्षाच्या कालावधीकरीता अपंग मित्र कक्ष चालविण्याच्या मंजुरीस्तव व खालील प्रस्तावित खर्चास मंजुरी देणे बाबत प्रस्ताव सादर.

| अ. क्र. | लेखाशिर्ष अपंगाचे पुनर्वसन व उपचार केंद्र | मागील वर्षात ठेवण्यात आलेली तरतुद २००६-२००७ | मागील वर्षात दिलेली रक्कम (अपंगाचे पुनर्वसन व उपचार केंद्र 4 RE २४६) | प्रस्तावित रक्कम सन २००६-०७ | प्रस्तावित रक्कम सन २००७-०८ |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मानधन**<br>अ.कम्युनिटी बेस्ड वर्कर्स<br>24 Days x 175 Rs. x 2 Workers x 12 Months | - | - | रू.**१,००,८००/-** | रू.**१,००,८००/-** |
| २ | **ब सुपरवाईझर**<br>24 Days x 195 Rs. x 1 Worker x 12 Months | | | रू.**५६,१६०/-** | रू.**५६,१६०/-** |
| ३ | **प्रवास खर्च (३ व्यक्तीचा)**<br>500/- Rs. Per person per Month. | | रू.१२,०६०/-(जुलै २००६ ते मार्च २००७) | | रू.**१८,०००/-** |
| | **एकुण खर्च** | रू.५.०० लाख (अपंगांचे पुनर्वसन व उपचार केंद्र) | रू.१२,०६०/- | रू.**१,५६,९६०/-** | रू.**१,७४,९६०/-** |

सन २००८-०९ या वर्षाचा खर्च रू.१,७४,९६०/- एवढा प्रस्तावित आहे. (तसेच सन २००९ नंतरच्या वर्षास मंजुरी ही अपंग मित्र कक्षाच्या कामकाजाच्या अहवालानुसार व कामाचे मुल्यमापन केल्यानंतर ठरविण्यात येईल.) करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधि. :महानगरपालिकेच्या ०३ दवाखाण्यामधे अपंग मित्र कक्ष २००४ साली सिल्कमील कॉलनी येथे सुरू केले आहे. २००६ साली मुकूंदवाडी, नेहरूनगर येथे कक्ष सुरू केले. अपंग मित्र स्थापनेचा हेतू म्हणजे अपंग व्यक्तीकरीता कुठल्या ना कुठल्या प्रकारे मदत केली जाते. जनार्थ नावाची संस्थेच्या माध्यमातून ०३ लोक काम करतात. साधारण: ०२ दिवस प्रत्येक सेंटरला सहा दिवस काम केले जातात. सर्वात कमी मानधनाच्या निवेदवर त्यांना काम द्यावे असे मा.आयुक्तांचे निर्देश आहे व त्यांना महिन्यातून २४ दिवस काम दिले जाते.

श्री.अ.रशिद मामू : दवाखाण्याच्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही. आजूबाजूला घाण, दुर्गंधी पसरलेली आहे. ऑपरेशन करण्यासाठी घरून पाणी आणावे लागते. या बाबत कुठल्या उपाययोजना आखलेल्या आहेत.

आरोग्य वैद्य.अधि. : वार्ड इंजिनिअर,वॉर्ड अधिकारी यांना सांगून पाण्याचा प्रश्न सुरळीत करण्यात येत आहे.

मा.सभापती : पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. विषय क्र.७१ मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे अपंग व्यक्तींना नोंदणी करणे, थेरपी देणे, मोफत शस्त्रक्रिया करून देणे, शैक्षणिक मार्गदर्शन, समुपदेशन इ. कामे करण्यासाठी अपंग मित्र कक्षाचे काम समाधानकारक असल्यामुळे जनार्थ संस्था या संस्थेस महानगरपालिका आरोग्य केंद्रातून अपंग मित्र कक्ष चालविण्यास सन २००६-०७ व २००७-०८ या वर्षासाठी कार्योत्तर मंजुरी देण्यात येते व सन २००८-०९ या पुढील वर्षाच्या कालावधीकरीता जनार्थ या संस्थेस अपंग मित्र कक्ष चालविण्यास तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या प्रस्तावित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ४४ सेंट्रल नाका कब्रस्तान ते रहेमानिया कॉलनी पर्यंत आरसीसी गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.२४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधरण सभा ठराव क्र.०६/०४ दि.२०.११.२००७ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त निविदा बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.काझी मुबारीसउद्यीन बशीरउद्यीन | **३.१९% कमी दराने** |
| २. | एकनाथ माणिकराव दहिफळे | **१.५२% कमी दराने** |
| ३. | मे. आर. के. कन्स्ट्रक्शन | **५.९९% जास्त दराने** |

उपरोक्त नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१९% कमी दराची निविदा **श्री.काझी मुबारीसउद्यीन बशीरउद्यीन** यांची आहे. मा. आयुक्त यांनी त्यास मान्यता दिली आहे.

मा.स्थायी समिती विषय क्र.४४६, दिनांक १५/३/२००८ अन्वये सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला आहे.

करीताश्री. काझी मुबारीसउद्यीन बशीरउद्यीन यांची ३.१९% कमी दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव पुनःश्च मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : विषय क्रमांक ७३ चुकून झालेला आहे परंतू विषय क्रमांक ७२ असा आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : सदरचा विषय मागील बैठकीत सुध्दा स्थगित ठेवण्यात आला होता. दरसुची २००६-२००७ ची दर्शविण्यात आलेली आहे. सध्या २००८ चालू आहे. ३.१९ टक्के बिला प्रमाणे दाखविण्यात आले आहे. मंजूर करण्या हरकत नाही. कामाची क्वालिटी तपासणे महत्वाचे आहे. |
| मा.सभापती | : स्थायी समितीस एक पत्र देण्यात आले आहे ते पत्र नगर सचिव वाचवून दाखवतील. |
| नगर सचिव | : पत्र वाचवून दाखविण्यात आले. ६ महिण्यापैक्षा जास्त काळ झालेला आहे. सदरचे दर ९० दिवस बंधनकारक आहे. सध्या बाजारात मटेरिअलचे भाव वाढलेले आहे त्यामुळे हे दर परवडणार नाही. त्यामुळे चालू दर नुसार अलॉट करावे. अशी विनंती करण्यात आलेली आहे. |
| उप अभि.(ड्रेनेज) | : वार्ड क्र ४४ आर.सी.सी. ची गटार बांधणे असा आहे. अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यावर निवीदा बोलावल्या आहे. निवीदा जाने २००८ रोजी प्राप्त झाली आहे. निवीदा प्राप्त झाल्यावर मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला. मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात आला होता त्याचे इतिवृत्त जून २००८ रोजी प्राप्त झाले. सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला आहे. त्यानुसार मा.स्थायी समितीला पुन्हा विनंती केली आहे की, हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. |
| श्री.संजय जोशी | : ९० दिवस जो वेळ लागला. निविदा उघडल्यापासून की कार्यदेश दिल्यापासून हा वेळ विचारात घेण्यात येतो? |
| उप अभि.(ड्रेनेज) | : निवीदा उघडल्यापासून ९० दिवस धरतो. मार्च महिण्यात स्थायी समितीने स्थगिती दिली. जून महिण्यात इतिवृत्त मिळाले. |
| मा.सभापती | :संबधीत अधिकारी सभागृहात उपस्थित असतात त्यामुळे त्यांना माहिती असते की, प्रस्तावाला स्थगीती मिळाली की मंजूरी झाली. कारण ते सभांना हजर असतात. त्यांच्या लक्षात यायला पाहिजे. |
| श्री.रविकांत गवळी | : शॉर्ट टेंडर नुसार नोटीस काढा, नविन टेंडर काढण्यात यावे. |
| मा.सभापती | : विषय क्रं. ७२ रद्द करून नविन टेंडर काढण्यात यावे. |

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव रद्द करून फेरनिविदा काढण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. त्यास मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. ७३ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त(सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, संत एकनाथ रंगमंदिर नाट्यगृह, उस्मानपुरा येथील जुन्या खुच्या जागेवरून काढुन घेवुन जाण्यासाठी (विक्रीसाठी) जाहीर सूचना/जाहीर लिलाव (तिसरी वेळ) साठी जा.क्र.मनपा/मामअ/८३५/२००८, दि.५-७-२००८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिली असता व प्रत्यक्षात जाहीर निविदा/लिलाव कार्यवाही दिनांक १४/७/२००८ रोजी दुपारी ३.३० वाजता ठेवली असता खालील व्यक्तींनी लिलावात भाग घेतलेला आहे.

**०१. श्री. स. एजाज स. रईस**

बाल्कनी मधील खुर्च्यांसाठी शेवटची बोली रक्कम रू.७५/- प्रती नग.
हॉल मधील खुर्च्यांसाठी शेवटची बोली रक्कम रू.११०/- प्रती नग.

**०२. श्री. शेख मजीद शेख रहीम**

बाल्कनी मधील खुर्च्यांसाठी शेवटची बोली रक्कम रू.७०/- प्रती नग.
हॉल मधील खुर्च्यांसाठी शेवटची बोली रक्कम रू.१०५/- प्रती नग.

**०३. श्री. मोबीन अहमद खान**

बाल्कनी मधील खुर्च्यांसाठी शेवटची बोली रक्कम रू.१००/- प्रती नग.
हॉल मधील खुर्च्यांसाठी शेवटची बोली रक्कम रू.११५/- प्रती नग.

महानगरपालिकेने सदरील खुर्च्या जागेवरून काढुन स्वखर्चाने नेण्यासाठी (विक्रीसाठी) गुत्तेदारांना ऑफर्स मागीतली असता श्री.मोबीन अहमद खान यांनी बाल्कनीमधील खुर्च्यांसाठी प्रती नग रू.१००/- व हॉलमधील खुर्च्यांसाठी प्रती नग रू.११५/- अशी बोली बोललेली आहे.

सदरील बोली मान्य करावयाची झाल्यास बाल्कनीमधील सर्व खुच्या अंदाजे २७७ नग असून प्रती नग रू.१००/- प्रमाणे एकुण रक्कम रू.२७,७००/- व हॉल मधील सर्व खुर्च्या अंदाजे ६५० नग असून प्रती नग रू.११५/- प्रमाणे एकुण खुर्च्यांचे रक्कम रू.७४,४५०/- असे दोन्ही मिळून रक्कम रू.१,०२,४५०/- चा महानगरपालिकेस महसूल प्राप्त होईल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : विषय क्रमांक ७३ मंजूर करण्यात येतो. |
| श्री.रविकांत गवळी | : संत एकनाथ रंग मंदिरातील खुर्च्यांचा लिलाव झालेला आहे का करावयाचा आहे. मान्यता कशाची घ्यावयाची आहे? |
| उपआयुक्त सिडको | : संत एकनाथ रंग मंदिर येथिल खुर्च्यांचा लिलाव करण्यात आला आहे. प्रति खुर्ची १०० आणि ११५ याप्रमाणे लिलाव करण्यात आला आहे आणि लिलावाच्या रक्कमेला मान्यता देण्यात यावी. |
| मा.सभापती | : प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर नाट्यगृह, उस्मानपुरा येथील जुन्या खुर्च्या जागेवरून काढुन घेवुन जाण्यासाठी (विक्रीसाठी) जाहीर लिलावातील जास्तीचे बोलीनुसार श्री.मोबीन अहमद खान यांनी बाल्कनी मधील खुर्च्यांसाठी प्रती नग रू.१००/- व हॉलमधील खुर्च्यांसाठी प्रती नग रू.११५/- अशी जास्तीची बोली बोललेली असल्याने त्यांचे बोली रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : संत एकनाथ रंग मंदिर येथील बाजूला पार्कीग असणे गरजेचे आहे. लवकरात लवकर पार्कीग करून घेण्यात यावी. रोड वाईडिंगमधे जे काम चालू आहे.इतर भागात जे बांधकाम चालू असते त्यावर व अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेच्या ६ प्रभागामधे सहा इमारत निरीक्षक कार्यरत आहेत काय की, संपूर्ण महानगरपालिकेच्या क्षेत्रामधे श्री.अन्वर खान हेच इमारत निरीक्षक म्हणून आहे काय? वस्तूस्थितीचा खुलासा करण्यात यावा. |
| उपआयुक्त(सिडको) | : प्रशासकीय विभागामधे एकुण पाच इमारत निरीक्षक आहेत. त्यांना निश्चित असा प्रभाग देण्यात आलेला नाही. प्रशासकीय विभागास अजून ४ ते ५ इमारत निरीक्षकांची आवश्यकता आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : अन्वर खान हे चांगले काम करतात. |
| श्री.रविकांत गवळी | : कशा पध्दतीने काम करता तो खुलासा करावा. |

मा.सभापती : प्रशासकीय विभागास अजून ५ ते ६ इमारत निरीक्षकांची आवश्यकता आहे.

उपआयुक्त(म) प्रशासकीय विभागास ३ ते ४ सक्षम इमारत निरीक्षक देण्याची व्यवस्था करण्यात येईल तेव्हा प्रत्येक प्रभागात एक एक इमारत निरीक्षक देण्यात येईल.

श्री.संजय जोशी : श्री.बोडस हे फिरतीचे काम करीत नाही. ऑफीसमध्ये बसतात. त्यांची बदली करावी.

**विषय क्र. ७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जामा मस्जीद परिसरामध्ये दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") केला जातो. त्या ठिकाणी रात्रीचे वेळी विद्युत व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्यासाठी पोल व पथदिवे लावण्याचे कामासाठी रक्कम रू.३,१६,४२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : जावेद हसन खान सदस्य,स्था. स. अनुमोदक : अ.रशीद खान मामू सदस्य,स्था.स.

सभापती : विषय क्र.७४ लाईट संबधी आहे. **मंजूर.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जामा मस्जीद परिसरामध्ये दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") केला जातो. त्या ठिकाणी रात्रीचे वेळी आवश्यक विद्युत व्यवस्था करणेसाठी पोल व पथदिवे लावण्याचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद/चर्चा :**

श्रीमती जयश्री किवळेकर : १२ इमारत निरीक्षकांची आवश्यकता आहे. सध्या ०५ इमारत निरीक्षक कार्यरत आहेत. सिडको हडकोत जे अनाधिकृत बांधकाम चालू आहे त्यावर कुणाचे नियंत्रण राहतील. सिडको हडकोतील अनाधिकृत बांधकामावर नियंत्रणासाठी कुठल्यातरी एका इमारत निरीक्षकावर जबाबदारी टाकण्यात यावी. व आमची अशी विनंती आहे की, जे ५ इमारत निरीक्षक आहेत त्यांना ६ प्रभागनिहाय नियुक्ती करण्यात यावी. म्हणजे अनाधिकृत बांधकामाची जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : माजी आयुक्त यांनी बांधकाम परवानगी सुलभ होण्यासाठी व महसूल जमा होण्याकरीता विवीध प्रकारच्या अंमलबजावणी करण्यात आली आहे. परंतु शहरातील अनाधिकृत बांधकामामुळे महानगरपालिकेचा महसूल बुडत आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर: सध्याचे ५ इमारत निरीक्षक यांचेवर जबाबदारी टाका. सिडको प्रभागा करीता एक इमारत निरीक्षक देवून जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

दत्ताभाउ पाथ्रीकर : पदमपुरा येथिल अतिक्रमण काढण्यात येत होते परंतु तिथे दारूचे दुकान राहीले आहे. तसेच दैनिक सामाना मधे वाचण्यात आले की, सभापतीच्या पुत्राला बांधकाम परवानगी एका दिवसात मिळाली आहे तर मग सर्वसामान्य जनतेलाही एका दिवसात बांधकाम परवानगी मिळायला हवी.

श्री.रविकांत गवळी : नगरभुमापन क्रं ६२१२ मधे सराफारोड जो की, ६० मिटरचा आहे. मार्कींग झाल्यानंतर २ मिटर पर्यंत बांधकाम करू शकत नाही. ज्या पध्दतीने रॅम घ्यावयास पाहिजे होते त्या पध्दतीने रॅम घेतलेला नाही. व सदरील बांधकाम अनाधिकृत आहे. याबाबत खुलासा देण्यात यावा.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

क.अभि.(न.र.) श्री.चामले : सीटीएस नं ६२१२ सराफा रोड येथिल बांधकाम परवानगी ०९.०७.२००८ रोजी दाखल झाली आणि १९.०७.२००८ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली. दहा दिवसांनतर परवानगी देण्यात आली.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : बांधकाम परवानगी व बांधकामावरील बांधकाम यात काही तफावत आहे काय?

श्री.संजय जोशी : दिलेली बांधकाम परवानगी योग्य आहे का, जागेवर तफावत आहे का, पहायला कोण गेले होते. त्यांचे काय पदनाम आहे. यांचे पद कनिष्ठ अभियंता आहे त्यांना सर्व शहराची माहिती आहे का?

क.अभि.(न.र.)श्री.चामले : जागेवरील बांधकामाबद्दल माहिती नाही.

मा.सभापती :जागेवरील बांधकाम श्री.पी.जी.पवार यांना माहिती आहे ते सध्या कोर्टात गेलेले आहे.

श्री.जोशी : संबधीत माहितीचा खुलासा करणेसाठी सक्षम अधिकारी हजर पाहिजे.

मा.सभापती : सिटी सर्व्हे नं.६२१२ सराफा रोड येथिल बांधकाम परवानगी माझा मुलगा श्री.अब्दुल समीर अब्दुल साजेद यांनी घेतलेली असून तो माझ्यापासून वेगळा राहतो. त्यांनी नियमानुसार परवानगी घेवून बांधकाम केलेले आहे. माजी नगरसेवक श्री.जगदिश सिध्द यांनी आक्षेप घेतलेला आहे. माझी स्पष्ट विनंती आहे की, तिथे एक फुट जरी बांधकाम अनाधिकृत होत असेल तर मी राजीनामा देईन. श्री.जगदिश सिध्द ब्लॅकमेल करीत आहे. त्यांच्या वार्डात ४५ अनाधिकृत बांधकाम झालेले आहे. मी पोलिस आयुक्तांना भेटून निवेदन दिले आहे. एसीबी ला निवेदन दिले आहे. महानगरपालिका आयुक्तांना पत्र देवून विनंती केली आहे, माझ्या मुलाचे काम सराफा येथे नियमानुसार सुरू आहे. त्याची पहाणी करून खात्री करून घ्यावी. विनंती आहे, माझ्या मुलाचे काम पाहावे. तो माझ्यापासून वेगळा राहतो. आमचीही मिळकत ताब्यात घेवून भुसंपादनाची कारवाई लवकरात लवकर करण्यात यावी म्हणून विनंती केली आहे. परंतु श्री.जगदिश सिध्द यांचा भुसंपादनाला विरोध आहे. सौ.विणा गजेंद्र सिध्द यांच्या साथीने श्री.जगदिश सिध्द यांनी खोटी तक्रार दिली असून ते पैशासाठी ब्लॅकमेल करीत आहेत.

श्री.अ.रशिद मामू : सिटी सर्व्हे नं १२९६० जाफरगेट येथील २५ हजार स्के.फुट खुली जागा असून सदर जागा बोगस कागदपत्र लावून विकण्यात आली आहे. १९८२ ला ले-आऊट झालेले आहे. कसे विकले गेले?

श्री.रविकांत गवळी : मागील बैठकीत हा विषय उपस्थित झाला होता. अद्याप पर्यंत बांधकाम सुरू आहे ते थांबविण्यात आलेले नाही.

मा.सभापती : सदर प्रकरणाची माहिती घेतली असून बांधकाम परवानगी नुतनीकरण करून घेतले. तपासणी करून रिपोर्ट दिले आहे.

श्री.अ.रशिद मामू : सदर प्रकरणाबाबत पुर्ण माहिती कोणत्या अधिकाऱ्यांना आहे?

मा.सभापती : सिटीएस क्र.१२९६० जाफरगेट ले-आउट १९८२ मधे मंजूर झालेले आहे. खुली जागा बोगस कागदपत्राच्या आधारे विकण्याचा प्रयत्न केलेला आहे किंवा विकलेले आहे. असे स.सदस्य श्री.रशिद मामू यांनी व्यक्त केलेले आहे. म्हणून या प्रकरणी उपआयुक्त (सिडको) यांनी चौकशी करून तीन दिवसात अहवाल स्थायी समितीस द्यावा. त्यांना श्री.खरवडकर, श्री.एस.एस.कुलकर्णी हे त्यांना मदत करतील.

श्री.अ.रशिद मामू : काल उस्मानपुरा भागातील विना मार्कींग पाडण्यात आले. गणेश नावाचा मुलगा पडला. मार्कींग देत नाही. कर्मचाऱ्यांमध्ये ताळमेळ नाही. मार्कींग नाही तर का जातात.

मा.सभापती : गांधी पुतळा ते भडकल गेट येथील रस्त्याचे भूसंपादनाचे काम चालू आहे. श्री.शेट्टे साहेबांना विनंती करून काही व्यापा-यांनी सांगीतले की, आम्हाला नोटीस द्या. आम्ही आमचे बांधकाम पाडून घेतो. परंतू आजपर्यंत संबधीतांना नोटीस देण्यात आलेली नाही. मा.आयुक्तांनी आजच्या आज नोटीस देण्याचे निर्देश दिले. मा.आयुक्त व अधिकारी हे चांगले काम करत आहे. परंतु टी.पी. विभागाचे अधिकारी कर्मचारी यांना शहराच्या विकासाची इच्छा दिसत नाही.

श्री.अ.रशिद मामू : विना मार्कींग काढायला का गेले. पुर्ण तोडले. त्यांनाउ रिकामे करण्याची संधी दिली नाही. अतिक्रमण काढतांना ज्यांचे अतिक्रमण काढणार आहे त्यांना त्यांचे सामान काढण्याकरीता तरी वेळ द्या.

श्री.संजय जोशी : मार्कींग देण्यात यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : नेतृत्त्व बरोबर आहे का, बिल्डींग का पाडली, बाजुची का पाडली नाही. टाउन प्लॅनिंगचे कर्मचारी,अधिकारी मार्कींग का देत नाही. प्लॅनिंगचे इनचार्ज कोण आहेत? जी जमीन आहे तिचा महानगरपालिकेशी काही व्यवहार झाला आहे काय? दोन त्या जमीनीवर ज्या टपऱ्या आहेत त्या लीगली आहेत की, अनधिकृत आहे. मार्कींग करीता जे अधिकारी ते तुमच ऐकत नाही काय? आणि चौथी गोष्ट जिथे मार्कींग झालेली आहे तिथ पुन्हा जावू नका व पैठणगेट ते रंगारगल्ली चे अतिक्रमण का पाडले जात नाही?

श्री.वसंत नरवडे : मा.आयुक्त बंड साहेब आल्यामुळे शहरातील ११ रस्त्याचे अतिक्रमण काढण्याचे काम सुरू आहे. पैठणगेट भागात अतिक्रमण पथक आले जे स्वतःहून घर पाडत होते त्याचे घर पाडले, दोन चार जणांना FSI-TDR नको. मोबदल्याची तरतुद केली असेल. १० पैकी ३-४ घरांना

पैसे द्यायचे. १९५२-५४ च्या बांधकाम परवानग्या आहेत. भूसंपादन होताना १०० फुट-११८ फुटाचा वाद होतो. वातावरण खराब होते. श्री.शेट्टे यांच्या दर्जाचा आणखी एक अधिकारी देण्यात यावा. अतिक्रमण काढतांना तेथील नकाशे घेवून बसा. झेरॉक्स द्या म्हणजे तेथिल जनतेला परिपुर्ण माहिती मिळेल. ४ वाजता फटाके वाजत होते. टाउन प्लॅनिंग मार्फत संपादित भुसंपादनाचा मोबदला जे मागतात त्यांना देण्यात यावा. विकासाचे काम करायचे असेल तर १० घर घ्या तेथिल पुर्ण अतिक्रमण काढल्यानंतरच पुढील कारवाई करा. नोटीस मध्ये खुलासेवार सांगा. ज्यांना अनधिकृत म्हटले १९५२ ची परवानगी निघाली. कोर्टात जातात. पध्दतशीर पाहिजे.

मा.सभापती : टाउन प्लॅनिंगचे अधिकारी श्री.शेट्टे यांना सहकार्य करीत नाही.

श्री.नारायण कुचे : मूकुंदवाडी येथील १०० बाय १०० जागेत मनपाचे निलंबीत कर्मचारी श्री.भरत कुमार जैस्वाल यांच्या सासऱ्याच्या नावावर असलेली पिठाची गिरणी, २५ रूम असे अतिक्रमण आहे. मा.उच्च न्यायालयाने सांगीतले आहे. परंतु आजपर्यंत सदरील अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. याचा खुलासा करण्यात यावे.

मा.सभापती : मूकुंदवाडी येथील १०० बाय १०० जागेत जे अतिक्रमण आहे ते अतिक्रमण मंगळवापर्यंत काढुन जर महानगरपालिकेची असेल तर मनपाच्या ताब्यात घेण्यात यावी.

श्री.नारायण कुचे : सदरील जागा सिडकोची ४५ मी.डी.पी. रोडची जागा आहे.

श्रीमती सोफिया : सिल्कमिल कॉलनी येथील अमिन कॉम्पलेक्स येथिल अतिक्रमण काढण्यात आले नाही.

मा.सभापती : सिल्कमिल कॉलनी येथील अमिन कॉम्प्लेक्स येथिल अतिक्रमण प्रशासनाने त्वरीत काढावे.

श्री.रविकांत गवळी : सिडकोचा डि.पी. रस्ता अतिक्रमण काढुन डेव्हलप करून ताब्यात देतील. त्या अंतर्गत मनपा पाहिजे ते सहकार्य करेल, त्या डि.पी. रस्त्याचची काय स्थिती आहे. विकास केला का. सर्व डी.पी. रस्त्यावरील अतिक्रमण सिडको काढणार होते ते काढले का.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : कुणाच्या वार्डात अतिक्रमण सापडत नसेलतर माझ्या वार्डात १०० टक्के अतिक्रमण आहे.

श्री.रविकांत गवळी : एमजीएम नावाची संस्था आहे. त्यात एक डीपी रस्ता आहे. मा.सुप्रीम कोर्टाने आदेश दिला आहे की, रस्ता तयार करण्यात यावा. तर तो रस्ता का करण्यात येत नाही.

श्री.वसंत नरवडे : कैलासनगर ते मधला रस्ता जोपर्यंत मिळत नाही तो पर्यंत एमजीएमचा रस्ता तयार करता येत नाही.

मा. सभापती : कनेक्टींग रोड आहे.

श्री.रविकांत गवळी : सदर रस्त्याचा काहीही संबध नाही. मनपाच्या पाण्याच्या टाक्यासंपल्यानंतर हॉटेल गजल आहे तेथून सरळ २४ मिटरचा रस्ता जातो. त्याचा ह्याचा संबंध नाही. पुन्हा डावीकडे घेतो. सदरचा विषय गंभीर आहे याबाबत त्वरीत निर्णय घेण्यात यावे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत. मी प्रत देतो. भूसंपादीत झाला आहे. बाजूला गार्डन २.५ एकर महानगरपालिकेची जागा.

श्री.अ.रशिद मामु : शहानुरवाडी येथील जमीन वक्फ बोर्डाची आहे. त्यांचेशी बोलले का. कोठेही फौजफाटा घेवून चालले. खरे काय आहे, लोक भित आहेत. काम करा, भिती दाखवू नका. श्री.शेटे इंचार्ज आहेत. त्यांची ड्युटी आहे. पण त्यांचे कोणी ऐकत नाही. मालकाशी बोलावे, भाडेकरूशी नाही. सिस्टीमॅटीक करावे. ४ तास आगेदर सांगावे. १ तास वेळ दिला नाही. STD तोडली. बाजूचे ४ का पाडले नाी? ते येवून भेटले का? एक माणूस येतो, टपरी उचलतो. कारण त्याची जमीन मागे आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : अतिक्रमण पाडतांना डिपी प्लॅन पाहून अतिक्रमण पाडा. प्रशासकीय विभागाने नियोजन पध्दतीने अतिक्रमण काढावे. रोडमध्ये जेवढे येते ते क्लीअर करावे व पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची काळजी घ्यावी. गुलमंडीवर फटाके वाजले. तयारीने जावे. एमजीएम ने सिडकोशी करार केला. विकासाला दिले. रोडसाठी कोणीही नाही म्हणणार नाही. ठरवा, नियोजन करा.

मा.सभापती : श्री.शेट्टे यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (सिडको) : ज्या त्रुटी आहेत त्यात सुधारणा निश्चित करण्यात येईल, मार्कीग केल्यानंतर वैयक्तिक प्रॉपर्टीचे मोजून क्षेत्र काढण्यात येईल. मार्कीग करणेकरीता टाउन प्लॅनिगला अतिरीक्त कर्मचा-यांची गरज आहे. वैयक्तिक प्रॉपटीची मार्कीग करून त्यांचे किती जागा अतिक्रमीत जाते याची नोटीस देणेसाठी त्यांचे अतिक्रमण काढण्याचे थांबलेले आहे. ११ पैकी ९ मार्कीग पुर्ण झाली.

पैठणगेट येथे कारवाई सुरू केली परंतु निम्म्या लोकांच्या जागा ताब्यात मिळाल्या असुन निम्म्या लोक कोर्टात गेले होते त्यात कोर्टाने निकाल दिला की, त्यात कोर्टाने स्टे दिलेला नाही. कोर्टाने सांगीतले की, त्यांना टिडीआर, एसएफआय, मोबदला या संदर्भात महापालिकेने FSI, TDR, मोबदला यापैकी त्यांना काय पाहिजे त्यासाठी त्यांनी ॲप्रोच होणे आवश्यक आहे. त्यानंतर कारवाई करण्यात येइल.

श्री.वसंत नरवडे : तिन प्रॉपर्टी धारकांना पैशाच्या स्वरूपात मोबदला हवा आहे. मोबदला देण्यासाठी महापालिकेकडे फंड आहे काय? कधी देणार. पुर्ण बाधीत होते. काही ठिकाणी घरमालक म्हणतात प्रॉपर्टी ताब्यात घ्या.

उपआयुक्त (सिडको) : संबधीत प्रॉपर्टी धारकांची बैठक घेवून एसएफआर, टिडीआर, मोबदला पाहिजे त्या प्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : रंगारगल्ली भागातील अतिक्रमण केव्हा काढणार?

उपआयुक्त (सिडको) : संबधीत रस्त्याची प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर काढले जाईल.

मा.सभापती : सिडको येथील डीपी रस्ता व रस्ते विकसीत करणे व रस्त्यावरील अतिक्रमण काढणे संदर्भात व स.सदस्य श्री.गवळी यांनी विचार केलेली पुर्ण माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी. जे नविन ५ इमारत निरीक्षक देणार आहे त्यातील दोन सिडकोसाठी इमारत निरीक्षक देण्यात येतील.

श्री.रविकांत गवळी : शहरातील रस्ते मुंबई,पुणेच्या धर्तीवर चकचकीत होणार असे समजले ६०, २५ करोड रूपयाचे रस्ते घेण्यात आले. तर आज वर्तमानपत्रात आले की, चार कामे पेंडींग पडले आहे. कामास काय अडचण आहे.

मा.सभापती : पुढील बैठकीमधे सदर विषयाबाबत संपूर्ण माहिती प्रशासनाने द्यावी.

श्री.कचरू मोरे : प्रशासनाकडुन दोन प्रश्नाचा खुलासा हवा आहे. १) श्री.रशिद मामु यांनी पिरबाजार ते शहानुरवाडी येथिल अतिक्रमण पाडत असतांना जे घडले ते वास्तववादी व खरे असून तो व्यक्ती बी.ई.मॅकेनिकल आहे. त्याचे मोटार वर्कशॉप आहे. त्याने सांगीतले की मला मार्कींग देण्यात यावी. जेणे करून मी माझे अतिक्रमण काढून टाकतो. परंतु वॉर्ड अधिकारी श्री.पाटणी यांच्या सांगण्यावरून मार्कींग न करताच अतिक्रमण पाडण्यात आले. प्रशासकीय अधिकारी यांनी पाडण्यास विरोध केला होता. सभागृहाला विनंती करतो की, मार्कींग केल्याशिवाय अतिक्रमण पाडण्यात येवू नये. अवास्तव पाडू नका. बाकीच्या वेळी अधिकारी निघून गेले.
२) फुले नगर येथील वसाहत १९७५ साली वसली आहे. तिथे ८० फुटाचा जो रोड आहे. तर तेथील जागा ताब्यात घेवून अतिक्रमण काढा.व पर्यायी जागा देण्यात येईल का याचा खुलासा झाला पाहिजे. मार्कींग केल्याशिवाय अतिक्रमण काढण्यात येवू नये.

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (सिडको) : अतिक्रमण काढतांना कुढलाही भेदभाव होणार नाही व मार्कींग केल्यानंतर अतिक्रमण काढण्यात येईल.

श्री.रशीद खान मामू : तो गरीब व्यक्ती आहे. ३० फुअ का पाडले. पैसे कोण देणार. म्हाडाची जागा चौसरनगर पोलीस स्टेशनच्या बाजूला. इंजिनिअर होतो. विना मार्कींग गेले. अनधिकृतरित्या पाडले. काहीतरी मोबदला द्यावा.

श्री.कचरू मोरे :११ रस्त्याच्या रूंदीकरणा व्यतिरीक्त आणखी काही रस्ते घेणार आहे काय?

श्री.अ.रशिद मामू : ११ रस्त्याच्या व्यतिरीक्त अजून १० नवीन रस्ते रूंदीकरणात येणार आहे.

श्री.कचरू मोरे : १० नविन रस्ते रूंदीकरणात कुठले आहे ते सभागृहाला कळू द्या.

मा.सभापती : नवीन १० रस्ते आलेले आहेत. दि. ४.७.२००८ रोजी पत्र काढण्यात आलेले आहे. जो पर्यंत ११ रस्तेंचे भुसंपादनाचे काम पूर्ण होत नाही तो पर्यंत नविन रस्ते घेवू नये. नगरसचिव पत्र वाचून दाखवतील.

नगर सचिव : पत्र वाचून दाखविले. त्यात नमूद केल्यानुसार खालील १० नविन रस्ते आहेत.

१. रेल्वे स्टेशन ओव्हर ब्रिज ते दैनिक तरूण भारत उजवी बाजू.
२. सिल्लेखाना चौक ते लक्ष्मण चावडी.
३. लक्ष्मण चावडी ते एमजीएम दवाखाना.
४. ऑडिटर सोसायटी ते हर्सुल भगतसिंग नगर.

५. सेव्हन हिल ते टि.व्ही.सेंटर.
६. वीर सावरकर चौक ते टिळक नगर जवाहर पोलिस स्टेशन.
७. जाधववाडी ते पिसादेवी ३६ मिटर रूंद रस्ता.
८. हर्सुल जेल ते स्मृतिवन
९ . सुतगिरणी चौक ते शिवाजी नगर.
१०. बाराभाई ताजिया ते औरंगपूरा.

श्री.संजय जोशी : अमरप्रित ते बीड बायपास यात समावेश करावा. या रस्त्यावरील अतिक्रमण काढावे. MSRDC ने निविदा काढलेल्या आहेत.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : कामगार चौक ते सिडको बस स्टँड ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचाही समावेश करावा.

मा.सभापती : श्री.पी.जी.पवार यांनी सराफा रोडवर जे काम सुरू आहे. सीटीएस नं.६२१२ त्याबाबत खुलासा करावा.

श्री.पी.जी.पवार :सिटी सर्व्हे नं ६२१२ सराफा रोड वरील श्री.अब्दुल समिर अब्दुल साजेद यांना नियमानुसार बांधकाम परवानगी दिलेली आहे. दि.९.७.२००८ रोजी नगर रचना विभागात संचिका सादर करण्यात आली. त्यांना १९.०७.२००८ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. दिनांक १७.०७.२००८ रोजी साईडवर जावून बांधकामाची पहाणी करण्यात आली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : बांधकाम परवानगी प्रमाणे बांधकाम योग्य पध्दतीने चालू आहे काय?

श्री.पी.जी.पवार : बांधकाम परवानगीपेक्षा सामासिक अंतरात वाढ झालेली आहे. दंड आकारून नियमित करता येईल. प्रथम परवानगी ३१.०५.२००८ रोजी देण्यात आलेली आहे. आता रिवाईज करण्यात आले.

श्री.संजय जोशी : मनपाचा मुख्य आर्थीक स्त्रोत जकात आहे.३१.०७.२००८ रोजी जकातीचा ठेका संपत आहे. प्रशासनाकडुन जकात वसुल करण्या संदर्भात खुलासा सादर करावा. सहकार एजन्सी कडुक करणार की मनपा करणार याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सहकार एजन्सीला ठेका देणार आहे काय? तसा करार झाला आहे का? कुठल्या तरतुदीनुसार ठेका दिला आहे. जर त्यांना ठेका दिला नसेल तर प्रशासनाने कुठल्या प्रकारे तयारी केली आहे. रॉयल्टी भरली का, करारनामा केला का.

मा.सभापती : उप आयुक्त(महसूल) यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त(महसूल) : शासनाने १ ऑगस्ट पासून उपकर वसूल करण्या संदर्भात जाहीर केले होते. त्यानंतर शासनस्तरावर जुलै महिण्यात एक पत्र आले आहे. १ ऑगस्ट च्या ऐवजी उपकर ९ महानगरपालिकेमधे १ नोव्हेंबर पासून लागू होईल. शासनाने त्याच पत्रात उल्लेख केलेला आहे की, जकात वसुली खाजगी अभिकर्ता मार्फत चालू आहे त्यांच्याशी सामंज्यासाने निर्णय घेवून आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा. त्या दृष्टिने २८ जुलै पर्यंत निर्णय घेण्यात येईल. कर्मचारी घेण्याच्या संदर्भात सर्व तयारी झालेली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : निर्णय घेण्यासंदर्भातील अधिकार त्या त्या बॉडीकडे जायला पाहिजे.

श्री.वसंत नरवडे : महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सध्या काय आहे. विकासकामावर किती खर्च होणार पगारासाठी किती खर्च होणार स्पील वर्क मधील कामे होणार आहे काय? ठेकेदाराची बिले दिली जाणार आहे काय? जुन्या प्रॉपर्टी बाबत लोक कोर्टात गेलेले आहेत. उपआयुक्त महसूल व करमुल्य निर्धारक यांना बसवून तडजोड करायला लावा व टॅक्स वसूल करा.

श्री.संजय जोशी : दोन मिटींगपुर्वी त्यांना एक महिण्याची मुदत देण्यात आलेली आहे. एक लाखापासून ते दहा हजारपर्यंत ते ५० लाखापर्यंत विभागणी करून मालमत्ता टॅक्स बाबतचा अहवाल देण्यास सांगीतला आहे. अहवाल आल्यानंतर चर्चा करू. लेखा विभागाने खुलासा करावा की, मनपाची खरी रिसीप्ट किती आहे. त्यावर वेगळी मिटींग लावण्यात यावी.

मा.सभापती : पुढच्या मिटींग वसूली संदर्भात लावण्यात येईल.

श्री.संजय जोशी : वसूली टक्केवारीत न देता आकडेवारीनुसार माहिती देण्यात यावी. सध्याची आर्थिक स्थितीचे मुळ कारण सांगण्यात यावे. तसेच मालमत्ता धारक ५ लक्ष पासून १० लक्ष अशी थकबाकीदारांची यादी व केव्हापासून थकबाकी आहे याची माहिती देणे.वसुली बाबतची अवलंबवलेली पध्दत, चालू आर्थिक बजेटमधील निश्चित कुठली कामे होणार आहे

याबाबतची माहिती व सर्व प्रकारच्या मालमत्ताचे वसुली संदर्भात खुलासा पुढच्या बैठकीत ठेवण्यात यावा.

मा.सभापती : याबाबतची सर्व माहिती सर्व विभागांनी मंगळवारच्या बैठकीमधे देण्यात यावी.

श्रीमती मोमीन सफिया: गुंठेवारी संदर्भात मला जी माहिती दिली ती चुकीची असून वॉर्ड क्र.९६ मध्ये गुंठेवारीत किती रक्कम जमा केलेली आहे. याचा तपशिल देण्यात यावा.

श्री.संजय जोशी : गुंठेवारी लागून बरेच दिवस झालेले आहे त्यात प्रोगेस का झाले नाही या बाबतचा खुलासा सादर करण्यात यावा.

मा.सभापती : गुंठेवारी बाबत प्रशासनाला मागील बैठकीत माहिती देण्यात सांगीतले होते परंतू सभागृहास माहिती देण्यात येत नाही जर गुंठेवारी बद्दल पुढील बैठकीत माहिती आली नाही तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे : महानगरपालिका हद्दीत व्यवस्थित साफसफाई होत नाही शहरात डास, चिलटे यांचे प्रमाण वाढलेले आहे. डासांचा नायनाट करण्यासाठी वापरण्यात येणारे औषधांची फवारणी होत नाही. तसेच ज्या फवारण्या करण्यात येतात त्यांनी डास चिलटे यांच्यावर काहिच परिणाम होत नाही. परंतु आरोग्य विभाग या बाबतीत उदासीन आहे. साफसफाईचा ठेकेदाराचा ठेका हया महिण्याच्या शेवटपर्यंतच आहे त्यानंतर कुणाकडून साफसफाई केली जाणार कि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून साफसफाई केली जाणार?

मा.सभापती :आरोग्य अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.कचरू मोरे : आरोग्य अधिकारी यात उदासिन आहे.

श्री.अ.रशिद(मामू) :डासांचा नायनाट करण्यासाठी वापरण्यात येणारे औषध सध्या महानगरपालिके मधे उपलब्ध नाही. नोऑन बंद केले.

श्री.वसंत नरवडे : फायलींचा निपटारा लवकर होत नाही.

आरोग्य वै.अधिकारी : फवारणी संदर्भात जी औषध येतात ती शासनाकडून येतात. आपण फवारणी करत असतो. नोऑन औषधाच्या मागणीसाठी शासनाकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु अद्याप पर्यंत सदरील औषध आलेले नाही.

मा.सभापती : आपण किती वेळा पाठपुरावा केला आहे.

आरोग्य वै.अधिकारी : सतत पाठपुरावा केला जात आहे.

श्री.वसंत नरवडे :फवारणी करणारे कर्मचारी सकाळी २ ते ३ तास काम करतात व १० ते १२ ठिकाणी फवारणी करून नागरीकांच्या सहया आणल्या जातात.

आरोग्य वै.अधिकारी : हयांच्यावर देखरेखसाठी एमएसडब्ल्यु असतो त्याच्यावर मलेरिया सुपवाईझर आहे त्यांच्यावर बायोलॉजिस्ट असतो, हया सर्वावर देखरेख ठेवली जाते.

श्री.वसंत नरवडे : सदरील औषधांची क्वालिटी तपासणी केली आहे काय?

श्रीमती किवळेकर :सिडकोमधील कॉन्ट्रॅक्टरवर कुणाचे नियंत्रण आहे कुठले औषध वापरतात,किती वेळा फवारणी केली जाते, आठवडयाला किती वेळा फॉगींग करायला पाहिजे, किती वेळा पाण्यात औषधी टाकायला पाहिजे, फक्त एका वेळेला फवारणी झालेली आहे, कचरा कुंडयाच्या ठिकाणी जी पावडर टाकायला पाहिजे तिही क्वालिटीची नसते, कॉन्ट्रॅक्टरवर कुणाचेही नियंत्रण नाही. माझ्या वॉर्डात सगळे हायक्लास लोक रहातात. ते नियमीत टॅक्स भरतात व वसुली बाबतीत माझा वॉर्ड एक नंबरवर असूनही तेथील साफसफाई केली जात नाही. २२०० बंगले आहेत. घंटागाडी बंद झाली, कचरा पडतो. त्यामुळे लोकांचे आरोग्यावर परिणाम होतो. एजन्सी एकत नाही. वॉर्ड अधिकाऱ्यांना सांगावे लागते. निवडणुकीच्या कामात कर्मचारी व्यस्त आहेत. स्वच्छतेवर प्रशासनाचे स्वतःचे नियंत्रण असायला हवे. तसेच पाण्याच्या बाबतीत नियोजन असायला हवे. सर्वांना १ तास पाणी द्यावे. त्यात विसंगती नको.

मा.सभापती : आरोग्य विभागामार्फत आणि झोन अधिकाऱ्यां मार्फत नियमीत साफसफाई होत नाही. शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे त्या बाबतीत सदस्यांनी प्रशासनाला वेळोवेळी लक्ष केंद्रित करीत आहेत तरीही आरोग्य अधिकारी व वार्ड अधिकारी यांचे साफसफाईवर नियंत्रण नाही. हे स्पष्ट होत आहे जर आठ दिवसांत परिस्थिती सुधारली नाही तर प्रशासन व स्थायी समिती मार्फत कडक कारवाई करण्यात येईल. याची दक्षता घ्यावी.

श्री.अ.रशिद(मामू) : शहरातील पथदिवे बंद पडत आहेत. त्याचा खुलासा प्रशासनाने करावा.

उप अभि.(विद्युत) : एमएसइबी कडून ड्रम प्रोजेक्ट राबविला जात आहे. त्यात अंडरग्राउंड केबल वायर टाकली जात आहे. ओव्हरहेड असलेली वायर कट करीत आहे. त्यामुळे स्ट्रिट लाईट बंद होत आहे. एमएसइबी ला कळविण्यात आलेले आहे. श्री.अ.रशिद (मामू) यांच्या वार्डातील स्ट्रीट लाईटची वायर दोन दिवसांपुर्वीच कापण्यात आलेली आहे. व सप्लाय बंद करण्यात आलेले आहे. त्याबाबतीत एमएसइबी ला कळविण्यात आलेले आहे.

श्री.अ.रशिद मामू : ज्युबली पार्क येथे महानगरपालिकेतर्फे सिग्नल टाकण्यात आलेले आहे. परंतु गेल्या ३ महिण्यापासून सदरील सिग्नल बंद आहे.

उप अभि.(विद्युत) : ड्रम प्रोजेक्टद्वारे एमएसइबीने तेथील वायर तोडून टाकण्यात आलेली आहे.

श्री.अ.रशिद मामू : त्याबाबतीत पोलिस स्टेशन मधे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे काय? आपले त्यात एक लाखाचे नुकसान झालेले आहे. तसेच मनपाचे लाईटचे गुत्तेदार वेळेवर मिळत नाही.

उप अभि.(विद्युत) : एमएसइबी एक लाख रूपयांचे नुकसान भरपाई भरून देणार आहे.

मा.सभापती : या बाबतची माहिती पुढील बैठकीमधे पुरविण्यात यावी.

श्री.अ.रशिद मामू : कर्मचाऱ्यांना प्रमोशन दिले जाते त्यात श्री.बनसोडे-१९९६, श्री.शिरसाठ २००३, श्री.फालक-२००४, श्री.कालेले-२००५, श्री.गायकवाड-२००६, श्री.फारूख खान, श्री.खालेद सैफउद्दीन-२००७ मधे प्रमोशन दिले आहे त्यात स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आलेली आहे काय? ७ लोक आहेत.

मा.सभापती : पुढील बैठकीमधे अहवाल द्यावा.

श्रीमती किवळेकर : हॉटेल रामगिरी समोर रोडला डायर्व्हशन दिलेले आहे तिथे सिग्नल लावण्यात आलेले आहे तो सुरूच करण्यात आलेला नाही. व बिओटी तत्वावर एनर्जी सेव्हींगचे लाईट लावण्यात आलेले आहे. ते बंद पडलेले आहे.

मा.सभापती : सिडकोतील सिग्नल बंद आहे त्याबाबत श्री.बनसोडे यांनी खुलासा करावा.

उप अभि.(विद्युत) : रामगीरी हॉटेल येथिल सिग्नलचे काम पूर्ण झालेले आहे, परंतु पोलिस खात्याकडे पोलिस कर्मचारी नसल्याकारणाने त्या ठिकाणी सिग्नल बंद ठेवण्यात आलेले आहे. त्यांना पुन्हा पत्र देवून कर्मचारी पुरविण्याची विनंती केली जाईल.

"राष्ट्रगिता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद